

मुंबई : कोव्हिड-१९ केअर केंद्र उभारण्याचे सुरू असलेले काम.

# दहिसरच्या कोव्हिड केंद्रात १०६० खाटांची क्षमता

## एमएमआरसीतर्फे युद्धपातळीवर काम

सकाळ वृत्तसेवा

मुंबई, ता. १४ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे (एमएमआरसी) दहिसर चेकनाका आणि बोरिवली कांदरपाडा येथे कोव्हिड- १९ केअर केंद्र उभारण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. एमएमआरसीचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह दहिसर येथील १०६० खाटांची क्षमता असलेल्या कोव्हिड-१९ केअर सेंटरच्या कामाची रविवारी पाहणी केली. दोन आठवड्यांच्या आत हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे, असे एमएमआरसीने सांगितले.

मुंबई महापालिका क्षेत्रामध्ये कोरोना विषाणूचा संसर्ग दिवसेंदिवस वाढत असून, राज्य सरकारकडून शक्य तितकी वैद्यकीय क्षमता आणि कोव्हिड केंद्र वाढवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### ६६५ ऑक्सिजनयुक्त बेडसह ११० एचडीयूची व्यवस्था

एमएमआरसीद्वारे दहिसर जकात नाका येथे १०६० खाटांचे केंद्र उभारण्यात येत असून त्यामध्ये ६६५ ऑक्सिजनयुक्त बेड तसेच ११० हाय डिपेंडन्सी युनिट्स (एचडीयू) व्यवस्था असणार आहे. बोरिवली आरटीओ कार्यालयाजवळील कांदरपाडा येथे डायलिसिस सुविधा असणारे २२० बेड्सच्या अतिदक्षता विभागाचे एक अलगीकरण केंद्र बांधण्यात येणार आहे.



### गरजेनुसार आणखी केंद्र उभारणार

मुंबई शहर सध्या कठीण परिस्थितीतून जात आहे. अशा वेळी अधिकाधिक वैद्यकीय क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने या केंद्रांची निर्मिती करीत आहोत. गरज भासल्यास मुंबईतील इतर भागांत अशी केंद्रे उभारण्यास एमएमआरसी प्रशासन सज्ज असणार आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

### केईएम, कस्तुरबा आणि नायरमध्ये प्लाझ्मा थेरपी केंद्र

मुंबई महापालिकेच्या केईएम, कस्तुरबा आणि नायर रुग्णालयामध्ये प्लाझ्मा थेरपी केंद्र सुरू करण्यास इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने परवानगी दिली आहे. त्यामध्ये कोरोनामुक्त झालेल्या आणि प्रकृती चांगली असलेल्या रुग्णाच्या शरीरातील रक्तातून अँटीबॉडीज मिळवल्या जाणार असून त्यांचा वापर कोरोनाबाधित रुग्णांवर उपचारासाठी केला जाणार आहे. प्लाझ्मा थेरपी पालिकेच्या तीन मेडिकल कॉलेजमध्येही लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती पालिकेच्या आरोग्य विभागाने दिली.